माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३२६७**

**अपिलार्थी श्री. डिलोच जेसिंटो**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी सझा कोलेकल्याण-१**
महसूल भवन इमारत, ३ रा मजला, वांद्रे बस डेपो समोर,
वांद्रे (प.), मुंबई-५०

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी वांद्रे**
मंडळ अधिकारी वांद्रे व तलाठी यांचे कार्यालय, महसूल भवन इमारत,
३रा मजला, वांद्रे बस डेपोसमोर, वांद्रे (प), मुंबई-४०००५०.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०२.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.०८.२०२४ | १९.०९.२०२४, ३०.०९.२०२४ | ०१.१०.२०२४ | १५.१०.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०६.११.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १९.०९.२०२४ दि.३०.०९.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १५.१०.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थींनी दि. १९.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार मौजे कोलेकल्याण ता. अंधेरी येथील सर्वे क्र. १७८/९पै या जागेचा फे. क्र. ७४९५ या संचिकेची कागदपत्रे व RTS/WS/८८० दि.२८.०४.१९७६ व RTS/D.sp-८/७६ दि.३१.०८.१९७७ या संचिकेची छायांकित प्रतींची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी तथा सक्षम सनियंत्रण अधिकारी तथा नायब तहसिलदार (अधिग्रहण) मुंबई उपनगर जिल्हा यांनी अपिलार्थींना दि. १९.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, सदर अर्जात नमूद केलेला विषय मा. तहसिलदार, अंधेरी, आणि मंडळ अधिकारी वांद्रे व तलाठी यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्याने आपला अर्ज पुढील कार्यवाहीसाठी त्यांचेकडे पाठविण्यात येत आहे. तरी प्रकरणी त्यांचे कार्यालयाशी संपर्क साधून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी तथा तलाठी साझा कोलेकल्याण-१ यांनी अपिलार्थींना दि. ३०.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, आपण आपल्या अर्जामध्ये मौजे कोलेकल्याण, ता. अंधेरी येथील सर्वे क्र. १७८/९पै, या जागेचा फे.क्र.७४९५ या संचिकेची कागदपत्रे व RTS/WS/८८० दि.२८.०४.१९७६ व RTS/D.sp-८/७६ दि.३१.०८.१९७७ या संचिकेची छायांकित

..२/.

प्रतींची मागणी केल्याचे दिसून येत आहे. त्याअनुषंगाने इकडील अभिलेखांमध्ये सदर कागदपत्रांचा शोध घेतला असता, सदर संचिकेचे कागदपत्र इकडील अभिलेखांमध्ये आढळून येत नाहीत. आढळ होताच आपणांस देण्याची तजवीज ठेवली आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०१.१०.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.१०.२०२४ रोजी अपिलार्थी यांनी ग्राम महसूल अधिकारी कालेकल्याण - १ यांच्याकडील अभिलेख स्वत: तपासण्यात यावेत असे आदेशित करुन प्रथम अपील अंशत: मान्य करुन निकाली काढलेले आहे.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, अपेक्षित माहिती उपलब्ध झालेली नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. ०६.०२.२०२६ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर करुन नमूद केले की. केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर अपिलार्थी यांना अभिलेख तपासणीकरिता कळविण्यात आले होते. परंतु अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर गाव नमुना २ मध्ये उपलब्ध माहिती अपिलार्थींना देण्यात आलेली आहे.

५. आयोगाने विचारणा केल्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थी यांना मागितलेली माहितीची संबंधित नस्ती कायमस्वरुपी जतन करण्यासारखी आहे. असे असेल तर, जन माहिती अधिकारी असे कळवू शकत नाही की, संबंधित संचिका कार्यालयात उपलब्ध नाही.

६. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेख तपासून अपेक्षित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. जर संबंधित नस्ती अभिलेखात उपलब्ध होत नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी संबंधित पोलीस ठाणे येथे सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ प्रमाणे FIR दाखल करुन त्याच्या प्रतीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

## आदेश

सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २६.०२.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.

मुंबई
दिनांक : ०९.०२.२०२६

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३२६७**
**अपिलार्थी श्री. डिलोच जेसिंटो**
**सुनावणी दिनांक : २६.०२.२०२६ (In continuation of order dt ०९.०२.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेख तपासून अपेक्षित माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. जर संबंधित नस्ती अभिलेखात उपलब्ध होत नसेल तर जन माहिती अधिकारी यांनी संबंधित पोलीस ठाणे येथे सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ प्रमाणे FIR दाखल करुन त्याच्या प्रतीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २६.०२.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, इकडील अभिलेखांमध्ये वर नमूद कागपत्रांचा/संचिकेचा सखोल शोध घेतला असता, कागदपत्र/ संचिचा आढळून येत नाही. तसेच याअनुषंगाने मा. तहसीलदार अंधेरी यांचे कार्यालयास सुध्दा वर नमूद कागदपत्र/संचिका उपलब्ध असल्यास ते या कार्यालयास देणेकामी दि. १०.०२.२०२६ रोजी पत्र देण्यात आलेले असून, तेथे ही सदर संचिकेचा/कागदपत्रांचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे. जन माहिती अधिकारी यांनी मा. तहसिलदार, अंधेरी यांना लिहिलेल्या पत्राची प्रत आयोगास सादर केली.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही सादर केले की, जरी त्यांनी मागील सुनावणीस नमुद केले की, संबंधीत नस्ती कायमस्वरुपी जतन करण्यासारखी आहे तरी संबंधीत नस्ती कायम स्वरुपाची जतन करण्यासाठी नाही. फक्त फेरफार नोंदवही संबंधी नस्ती कायमस्वरुपी जतन करण्याची असते. अपिलार्थींनी आयोगास असे सादर केले की, जन माहिती अधिकारी यांचे असे मत असेल तर त्यांनी त्याबाबत शपथपत्रावर नमुद करावे.

४. जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत नस्ती कायमस्वरुपी जतन करण्यासारखी असेल आणि कार्यालयात अभिलेखात उपलब्ध होत नसेल तर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार संबंधीत पोलीस ठाणे येथे FIR दाखल करुन पुढील सुनावणीस FIR च्या प्रतीसह उपस्थित रहावे व जर त्यांचे मत संबंधीत नस्ती कायमस्वरुपी जतन करण्यासारखी नाही तर त्यांनी तसे स्पष्टपणे शपथपत्रावर नमुद करावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०७.०४.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

मुंबई
दिनांक : .२६.०२.२०२६

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३२६७**
**अपिलार्थी श्री. डिलोच जेसिंटो**
**सुनावणी दिनांक : ०७.०४.२०२६ (In continuation of order dt २६.०२.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत नस्ती कायमस्वरुपी जतन करण्यासारखी असेल आणि कार्यलयात अभिलेखात उपलब्ध होत नसेल तर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार संबंधीत पोलीस ठाणे येथे FIR दाखल करुन पुढील सुनावणीस FIR च्या प्रतीसह उपस्थित रहावे व जर त्यांचे मते संबंधीत नस्ती कायमस्वरुपी जतन करण्यासारखी नाही तर त्यांनी तसे स्पष्टपणे शपथपत्रावर नमुद करावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०७.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, तहसील कार्यालय, अंधेरी यांचे कार्यालयातील अभिलेखांमध्ये सदर कागदपत्रे/संचिका आढळून आलेली असून, सदरची मूळ संचिका/कागदपत्रे अपिलार्थी यांनी तहसिल कार्यालय, अंधेरी येथे जावून समक्ष पाहिलेली आहेत. याअनुषंगाने अपिलार्थी यांना सदरची उपलब्ध माहिती घेवून जाणेस वेळोवेळी भ्रमणध्वनीद्वारे तसेच समक्ष विनंती केली असता, त्यांनी सदरची माहिती सुनावणीच्या वेळेस प्राप्त करुन घेईल असे सांगितले.

३. जन माहिती अधिकारी यांनी तहसील कार्यालय, अंधेरी कार्यालयाकडून प्राप्त छायांकित प्रत आयोगास सादर केली. सदर पत्र अपिलार्थींना दाखविले असता अपिलार्थींनी निदर्शनास आणले की, त्यांनी माहिती अर्जात नमुद केलेले आदेश दि. २८.०४.१९७६ व दि. ३१.०८.१९७७ ची छायांकित प्रती संचिकेत उपलब्ध नाहीत. त्यावरुन माहिती अर्जात नमुद केलेल्या संचिका हीच संचिका आहे, हे स्पष्ट होत नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही सादर केले की, त्यांनी सादर केलेल्या संचिकेवर फेरफार क्र. ७४९५ नमुद आहे व त्यांनी मान्य केले की, सदर संचिकेत अपिलार्थींनी माहिती अर्जात नमुद केलेली आदेशांची प्रत उपलब्ध नाही.

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, ते शपथपत्र देऊ शकत नाही की, अपिलार्थींनी मागणी केलेली संचिका हीच संचिका आहे. कारण सदर संचिका तहसील कार्यालय, अंधेरी या कार्यालयाचा अभिलेख आहे.

६. सदर प्रकरणी अधिक स्पष्टतेसाठी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस तहसीलदार, अंधेरी यांची उपस्थिती आवश्यक आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २१.०४.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

8-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.०४.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

प्रत:- तहसीलदार अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा.

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३२६७**
**अपिलार्थी श्री. डिलोच जेसिंटो**

**सुनावणी दिनांक : २१.०४.२०२६ (In continuation of order dt ०८.०४.२०२६)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, ते शपथपत्र देऊ शकत नाही की, अपिलार्थींनी मागणी केलेली संचिका हीच संचिका आहे. कारण सदर संचिका तहसिल कार्यालय, अंधेरी या कार्यालयाचा अभिलेख आहे. सदर प्रकरणी अधिक स्पष्टतेसाठी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीस तहसिलदार, अंधेरी यांची उपस्थिती आवश्यक आहे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी क-१, व नायब तहसिलदार, अंधेरी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी मागील सुनावणीमध्ये नमूद केलेले तहसिल कार्यालय, अंधेरी येथील मूळ संचिका आयोगास सादर केली. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सदर संचिका अपिलार्थींना निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेली सदर संचिकेमध्ये अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद केलेले दि.२८.०४.१९७६ व दि. ३१.०८.१९७७ ची प्रत उपलब्ध नाही. परंतु माहिती अर्जामध्ये नमूद केलेल्या सर्व्हे क्र. १७८/९पै उल्लेख सदर नस्तीमध्ये आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक उत्तर आदेशप्राप्तीच्या १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने कळविण्यात यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai
सत्यमेव जयते

प्रदीप व्यास
27-4-2026

**मुंबई**
**दिनांक : २७.०४.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**